MGT

" महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम "
ग्रामपंचायतींना तंटामुक्त गाव समितीच्या बैठका आयोजित करणे आणि विविध प्रकारच्या नोंदवह्या व लेखन सामग्री खरेदी करण्यासाठी सन २०१०-२०११ या वर्षाकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत....

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक तंमुगा: १०१०/प्र.क्र.११३/२०१०/पोल-१५,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक :- ११ जानेवारी , २०११**

**वाचा :- १) शासन निर्णय गृह विभाग क्रमांक- तंमुगा-१००८/सीआर-४३/२००८/पोल-१५, दि.२४/८/२००८.**
**२) अवर सचिव गृह विभाग डीयुडी-१ यांचे पत्र क्र.एसयुपी-१११०/प्र.क्र.२५१/१०/डीयुडी-१ दि.**
**३१/१२/२०१०**

**शासन निर्णय :-** दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम सुरु करण्यात आली आहे. सदर मोहिम राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सातत्याने राबविण्यात येणार असून मोहिमेसाठी ग्रामपंचायत हा घटक विहित करण्यात आला आहे. ही मोहिम अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी ग्रामपंचायतींना बैठकांचे आयोजन करणे, नोंदवह्या ठेवणे, तंट्यांची माहिती संकलित करणे या बाबींसाठी काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. त्यानुसार राज्यातील ४,००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना प्रतिवर्षी रु. १००० /- याप्रमाणे आणि ४,००१ व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना प्रतिवर्षी रु. २०००/- याप्रमाणे एकूण रु. ३,१२,२९,०००/- (रु. तीन कोटी बारा लाख एकोणतीस हजार फक्त) इतका निधी सन २००८-०९ व सन २००९-१० या वर्षाकरीता उपलब्ध करुन देण्यात आला होता. सन २०१०-२०११ या वर्षाकरीता ही सदर ग्रामपंचायतींना एकूण रुपये ३,१२,२९,०००/- (रुपये तीन कोटी बारा लाख एकोणतीस हजार फक्त) इतका निधी या आदेशान्वये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

०२. पोलीस महासंचालकांनी जिल्हानिहाय ग्रामपंचायती व त्यांची लोकसंख्या विचारात घेवून उक्त तरतूदीचे जिल्हानिहाय वाटप तात्काळ करावे. पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील ४००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना रु.१०००/- आणि ४००१ व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना रु.२०००/- इतक्या तरतूदीचे तात्काळ वाटप करावे.

०३. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत ग्रामपंचायतींना निधी उपलब्ध करुन देण्यासाठी रु.३,१२,२९,०००/- (रु. तीन कोटी बारा लाख एकोणतीस हजार फक्त) मागणी क्र.बी-१, प्रधान लेखाशीर्ष- २०५५-पोलीस, (००) (१०) तंटामुक्त गाव (२०५५-०५६३ ३) ३१ सहायक अनुदाने,

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा:- DC
क्रमांक नं.:-
-3 FEB 2011
नोंद वही नं.
विवरण नं.:-
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

(योजनेत्तर/दत्तमत) या खालील सन २०१०-११ च्या मंजूर तरतुदीतून संदर्भीत क्र.२ येथील पत्राने कळविल्याप्रमाणे मंजूर झालेल्या निधीतुन भागविण्यात यावा.

०४. उपरोक्त तरतुदीतून शासन निर्णय क्रमांक - तंमुगा १००८/सीआर-४३/२००८/पोल-१५, दिनांक १४/८/२००८ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या नोंदवह्या, लेखन सामग्री व बैठकांसाठी खर्च करता येईल. सदर खर्चाचा हिशेब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे आणि संबंधित शासकीय यंत्रणांना याबाबत आवश्यक ती माहिती पूरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकामार्फत तंटामुक्त गाव समितीची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( वि. फ. वसावे )
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महालेखापाल-२,नागपूर, महाराष्ट्र राज्य,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, व्यय-७, अर्थ-२, अर्थ-११, मंत्रालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निवड नस्ती (पोल-१५).